**अतितात्काळ**

क्र.परिपत्रक/गट-अ व गट-ब (राजपत्रित)/अराजपत्रित/९२/प्रशा-२/ ८७४
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
दिनांक : ६ जून, २०१७

विषय : हज-२०१७ करिता खादिमुल हुज्जाजची निवड करण्याबाबत.

संदर्भ : नियोजन विभाग, पत्र क्रमांक:संकीर्ण-१०१७/सं.क्र.३४३/का.१४२६ दि.३/६/२०१७ व त्यासोबतचे महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांचे दिनांक ९/५/२०१७ चे पत्र त्यासोबतच्या सहपत्रांसह

परिपत्रक

नियोजन विभागाच्या संदर्भिय दिनांक ३/६/२०१७ च्या पत्रासोबतचे महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांचे दिनांक ९/५/२०१७ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रांन्वये हज २०१७ करिता राज्य शासनातर्फे पाठवावयाच्या खादिमुल हुज्जाज यांची निवड महाराष्ट्र राज्य हज समिती मार्फत करावयाची आहे. यास्तव राज्य शासनाच्या सर्व विभागांतर्गत कार्यरत असलेल्या **पात्र व इच्छुक मुस्लिम उमेदवारांना (वर्ग-१ व त्यावरील अधिकारी वगळून सर्व अधिकारी व कर्मचारी)** त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत योग्य मार्गाने नाहरकत प्रमाणपत्रासह विहित नमुन्यातील (परिशिष्ट) अर्ज दिनांक ७/६/२०१७ पूर्वी महाराष्ट्र राज्य हज समितीच्या मोहम्मद हाजी साबू सिद्दीकी मुसाफिरखाना, खोली क्र.६ व ७, एल.टी.मार्ग, मुंबई कार्यालयात पोहचतील अशा बेताने पाठविणेबाबत कळविण्यात आले आहे.

२/- तेव्हा संचालनालयाच्या गट-ब (राजपत्रित) व गट-ब (अराजपत्रित) तसेच गट-क संवर्गावरील सर्व पात्र व इच्छुक मुस्लिम अधिकारी/कर्मचा-यांना विचारणा करण्यात येते की, ते खादिमुल हुज्जाज म्हणून सेवा पार पाडण्यासाठी इच्छुक आहेत किंवा कसे याबाबत संचालनालयास हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एका दिवसाच्या आत कळवावे.

(संजय काळे)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
संचालनालयाच्या संवर्गावरील सर्व राजपत्रित (वर्ग-१ व त्यावरील अधिकारी वगळून सर्व अधिकारी) अधिकारी व अराजपत्रित कर्मचारीवर्ग

प्रत: कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२६), मंत्रालय, मुंबई यांना त्यांचे संदर्भिय दिनांक ३/६/२०१७ रोजीच्या पत्रासअनुसरुन माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव सादर.